महाराष्ट्र दूरसंचार परिमंडल,
छठवी मंजिल 'ए' विंग, प्रशासनिक भवन,
जुहू रोड, सांताक्रुज (प), मुंबई - 400 054.
Maharashtra Telecom Circle
6th Floor, 'A' Wing, Administrative Building,
Juhu Road, Santacruz (W), Mumbai - 400 054.
Phone : (O) : +91-22-26616999 • Fax : +91-22-26616777
E-mail : cgm_mah@bsnl.co.in

BSNL
Connecting India Faster

भारत संचार निगम लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम)
**BHARAT SANCHAR NIGAM LIMITED**
(A Govt. of India Enterprise)

# "कळकळीचं आवाहन"

महाराष्ट्र परिमंडळातील माझ्या सर्व प्रिय कर्मचारी बंधू-भगिनींनो, स.न.वि.वि........

सर्वप्रथम मी स्वत:स अत्यंत भाग्यवान समजतो, कारण मला आपणांसारखा कर्तव्यदक्ष, कठोर, मेहनती, प्रामाणिक, तसेच सुयोग्य दिशेने वाटचाल करून ध्येयपूर्ती करणारा कर्मचारीवर्ग लाभला. मी आपणा सर्वांचा शतश: ऋणी आहे, तसंच माझ्या मनांत आपणांबद्दल ओतप्रोत आदरही आहे.

असे असूनही, मोठ्या जड अंत:करणाने व खेदाने मला आपणांस सांगावे लागत आहे की, आपले परिमंडळ हे 'SIM विक्री' तसेच 'महसूल उत्पन्न व वृद्धी' (C-TOP-UP & IN Revenue) ह्या दोन्ही बाबतीत संपूर्ण भारतात कमालीचे पिछाडीवर आहे. आपण सर्वजण घेत असलेल्या अपार कष्टांबद्दल मला जराही किंतु नाही, पण परिमंडळाचा 'म्होरक्या', ह्या नात्याने मी आपणांस एक प्रेमरूपी साद हक्काने घालू इच्छितो ती अशी:

वर उल्लेखिलेल्या दोनही बाबींच्या पूर्ततेसाठी आपण सर्वानी त्यांत सर्वस्वीपणे जुंपून घेऊन त्यांत स्वत:स संपूर्णपणे झोकून द्यावे व आपल्या परिमंडळास एका विक्रमी व सन्माननीय स्थितीत आणावे.

**हा आता महाराष्ट्र परिमंडळाच्या प्रतिष्ठेचा एक गहन प्रश्न बनला आहे व आपल्या संस्थाप्रमुखांचे देखील यांवर व्यक्तिश: बारीक लक्ष आहे, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र परिमंडळाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे, हे सर्वांनी कटाक्षाने ध्यानी असू द्यावे.**

मला आपणा सर्वांचे सहकार्य नक्कीच लाभेल, यात मला यत्किंचितही शंका नाही .

पीयूष खरे 28/8/2018

मुख्य महाप्रबंधक

महाराष्ट्र परिमंडळ.



Scanned by CamScanner